सामान्य राज्य सेवा, गट-अ, प्रशासन अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची दि.०१/०१/२०१४ स्थित तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन परिपत्रक क्र. कृषिआ-३३१८/प्र.क्र.६९/१६ अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दि.०८.०३.२०१८.

वाचा :- १) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दिनांक २१/१०/२०११.
२) शासन परिपत्रक,कृषि व व पदुम विभाग क्र. कृषिआ-३३१८/प्र.क्र.६९/१६ अे, दि.२७.०२.२०१८ व शासन शुद्धीपत्र दि.०१.०३.२०१८.

परिपत्रक

सामान्य राज्य सेवा, गट-अ, प्रशासन अधिकारी या संवर्गातील अधिकाऱ्यांची दि.०१.०१.२०११, दि.०१.०१.२०१२ व दि.०१.०१.२०१३ स्थित अंतिम ज्येष्ठतासूची संदर्भ क्र.२ येथील दि.२७.०२.२०१८ च्या परिपत्रकान्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

२. या संवर्गाची दि.०१.०१.२०१३ ते दि.३१.१२.२०१३ या कालावधीची तात्पुरती ज्येष्ठतासूची (प्रपत्र-अ) या परिपत्रकासोबत जोडण्यात आली आहे. आयुक्त (कृषि) यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर तात्पुरती ज्येष्ठतासूची सर्व संबंधीत अधिकाऱ्यांच्या (रजेवर/प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांसह) निदर्शनास आणावी व तसे कळविल्याबाबत त्यांची स्वाक्षरी घेतलेली प्रत अभिलेखात ठेवावी. तसेच सदर तात्पुरत्या ज्येष्ठतासूची संदर्भातील आक्षेप/त्रुटी असल्यास त्याबाबत संबंधितांनी दि.२२.०३.२०१८ पर्यंत निवेदन सादर करावे. त्यानंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही, अशा सूचना संबंधीतांना द्याव्यात. दि.२२.०३.२०१८ पर्यंत प्राप्त झालेल्या निवेदनातील वस्तुस्थिती संबंधितांच्या उपलब्ध अभिलेखावरुन तपासून सदर निवेदने ,सविस्तर अभिप्रायांसह शासनास दि.२७.०३.२०१८ पर्यंत पाठवावीत. विहित कालावधीत आक्षेप/माहिती प्राप्त न झाल्यास सदर तात्पुरत्या ज्येष्ठतासूचीबाबत कोणाचाही आक्षेप नसल्याचे गृहीत धरुन अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात येईल.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८०३०८१७२८४९५४०१ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Umesh Madhukar Madan

Digitally signed by Umesh Madhukar Madan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a20cbbc812f8be8371fb8e96ab39865278090eca38793fc8e3967bd332d3272, cn=Umesh Madhukar Madan
Date: 2018.03.08 17:31:04 +05'30'

(उ.म.मदन)
शासनाचे अवर सचिव

सोबत : प्रपत्र-अ

प्रति,

१) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.
२) सर्व विभागीय कृषि सहसंचालक द्वारा आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.
३) सहसंचालक (आस्थापना), कृषि आयुक्तालय,पुणे.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दि.२१/१०/२०११ सोबतचे प्रपत्र "अ"										
सामान्य राज्य सेवा गट-अ प्रशासन अधिकारी संवर्गाची दिनांक ०१/०१/२०१४ स्थित तात्पूरती अतिरिक्त (Provisional additional) ज्येष्ठतासुची										
अ.क्र.	**ज्येष्ठता क्रमांक**	**नांव**	**प्रवर्ग # (नियुक्तीनंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक)**	**जन्मतारीख**	**नियुक्ती दिनांक**	**$ नियुक्तीचा मार्ग (सरळसेवेने/ मर्यादीत विभागीय परिक्षेद्वारे नियुक्त उमेदवारांचा गुणवत्ता क्रमांक व परिक्षेचे वर्ष.)**	**ज्येष्ठता दिनांक/ ज्येष्ठतेचा मानीव दिनांक**	**सेवानिवृत्तीचा दिनांक**	**शैक्षणिक अर्हता @**	**अभिप्राय**
१	**२**	**३**	**४**	**५**	**६**	**७**	**८**	**९**	**१०**	**११**
१	१७	श्री. विक्रम खोब्राजी भालशंकर	अनु.जाती	०३.०५.१९५८	३०.०९.२०१३	नियमित पदोन्नती	-	३१.०५.२०१६	एम.ए.	-
२	१८	श्री. राजेश्वर मोरेश्वर शिरसाठ	अनु.जाती	१६.०२.१९५७	२४.०९.२०१३	नियमित पदोन्नती	-	२८.०२.२०१५	बी.ए.	-
३	१९	श्रीमती दुर्गावती रमेश मखरे	अनु जमाती	१७.११.१९६०	२४.०९.२०१३	नियमित पदोन्नती	-	३०.११.२०१८	बी.ए.	